40

# उपवनसंरक्षक वनविभाग भंडारा यांचे कार्यालय

विषय :- सुरेवाडा उपसा सिंचन योजनेच्या बांधकामाकरीता आवश्यक वनजमिन पर्यायी दुप्पट वनेत्तर जमिन ७६.०० हे.उपलब्ध करुन देणेबाबत.(सुधारित)

क्रमांक :- कक्ष/वनसंवर्धन/प्र.क्र.२९२/४६४१/१४-१५

भंडारा दिनांक- 13/3/2015

प्रति ,

कार्यकारी अभियंता

गोसीखुर्द उपसा सिंचन विभाग

अंबाडी

संदर्भ :-१ आपले कार्यालयीन पत्र क्र. २८३५/चिशा/वनज/सुरेवाडा/१२दि. १.१०.२०१२

२ या कार्यालयाचे पत्र क्र. /वनसंवर्धन/प्र.क्र.२९२/३६२४ दि. १६/1/२०१५

३ वनपरिक्षेत्र अधिकारी लाखांदुर यांचे पत्र क्र. वपअ/ला/९०४ दि.६/२/२०१५

का.अ.गो.उ.सि. विभाग अंबाडी (भंडारा)

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, सुरेवाडा उपसा सिंचन योजना ता. भंडारा या योजनेच्या बांधकामाकरीता लागणा-या ३४.६५ हे. वनजमिनीचे, मोबदल्यात ६९.३० हे. दुप्पट अवनत झुडपी जंगल वनजमिन पर्यायी वनीकरणाकरीता या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष / वनसंवर्धन /प्र.क्र. २९२/७४७ दि.८/१०/२०१२ अन्वये वनपरिक्षेत्र अधिकारी, लाखांदूर यांनी कळविल्यानुसार मौजा दिघोरी येथिल गट क्र. ११०९,१११२,१११३,व १११४ ची निवड करुन कळविण्यात आले होते.त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | गट क्रमांक | एकूण क्षेत्र (हे.) | वनीकरण योग्य क्षेत्र (हे.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | दिघोरी | ११०९ | ५७.८४ हे. | ३०.०० | अवर्गीकृत वने ७/१२ नुसार सरकार वन विभागास हस्तांतरीत |
| २) | मुर्झा | २१८ | ११०.९० हे. | ३९.३० | गोसे pf कक्ष क्र ३३४ |
| | **एकूण गट संख्या -२** | | **१६८.७४** | **६९.३०** | |

वरील प्रमाणे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी कळविल्यानुसार पर्यायी वनीकरणाकरीता क्षेत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. सदर प्रकल्पाची कार्यवाही तुर्तास सुरु असल्याने या कार्यालयाचे पत्र क्र.२ अन्वये पुन्हा उपलब्ध करुन दिलेल्या क्षेत्राबाबत सदर क्षेत्र वनीकरणाकरिता योग्य आहे किंवा कसे? याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी लाखांदुर यांनी त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पामध्ये स्वत मोक्का तपासणी अंती सुधारीत उपलब्ध पर्यायी वनीकरण क्षेत्राचा अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार सुधारित क्षेत्र उपलब्ध असल्याबाबतचा तपशिल खलील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.मौजा- मुर्झा येथिाल गट क्र.२१८ मध्ये दाट झाडोरा असल्यामुळे सदर क्षेत्र घेण्यात येत नाही.

| अ.क्र. | गावाचे नाव | गट क्रमांक | एकूण क्षेत्र (हे.) | वनीकरण योग्य क्षेत्र (हे.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | दिघोरी | ११०९,१११२,१११३,१११४ | १८९.११ हे. | ७६.०० | अवर्गीकृत वने ७/१२ नुसार सरकार वन विभागास हस्तांतरीत पर्यायी वनीकरणास योग्य |
| | **एकूण गट संख्या -४** | | **१८९.११** | **७६.००** | |

उपवनसंरक्षक,

भंडारा, वनविभाग भंडारा.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी भंडारा यांना माहीती करीता सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- वनपरिक्षेत्र अधिकारी, लाखांदूर यांना माहीती व पुढील कार्यवाहीस रवाना सदरहु प्रकरणी पर्यायी वनीकरणाकरीता निवड केलेल्या जमिनीचा ७/१२ व नकाशा कार्यकारी अभियंता गोसीखुर्द उपसा सिंचन विभागा अंबाडी (भंडारा) यांचे कार्यालयाचे प्रतिनिधी यांना उपलब्ध करुन दयावा,व. योग्य सहकार्य करावे.